ePaper

**25 नोव्हेंबरच्या वंचित आघाडीच्या सभेचे राहुल गांधी यांना निमंत्रण**



| वर्ष - 7 | अंक - 194 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 22 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- सूर्यादादा बाबरचा विक्रम मोडणार?
- 'बिग बॉस'च्या घरात राखीची एन्ट्री?
- ईडीचा सोनिया गांधींना धक्का!
- गृहमंत्री म्हणून फडणवीस नापास!

## महापालिका शिक्षण विभागाचे 'कोअर टीम'ला 'दिल्ली मॉडेल'चे धडे!

### अभ्यास दौरा: अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांचा सहभाग

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या १८ सदस्यीय कोअर टीमसाठी दिल्लीत तीन दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोअर टीमने मुख्यत्वे दिल्लीची शैक्षणिक व्यवस्था व तेथील मार्गदर्शक-शिक्षक मॉडेल तसेच व्यावसायिक शिक्षण संस्थांना भेट देऊन तेथील पायाभूत सुविधा, प्रशासन, शिक्षक आणि मुख्याध्यापकांची क्षमता आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात सामावून घेण्यासाठी केलेल्या उपाययोजनांबद्दल अभ्यासपुर्ण माहिती समजून घेतली.**

या अभ्यास दौऱ्यात सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात तसेच मुख्याध्यापक, शिक्षक यांचा समावेश होता.

दिल्ली अभ्यास दौऱ्यावेळी तेथील शालेय शिक्षण मंडळ आणि राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) मधील महत्त्वाच्या शिक्षण अधिकाऱ्यांशीही महत्वाच्या बाबींवर चर्चा करण्यात आली.




कोअर टीमचे सदस्य तौसीफ परवेझ म्हणाले, आमचा भर केवळ शैक्षणिक दर्जा वाढवण्यावर नाही तर विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या अनुभवातील गुंतागुंत समजून घेण्यावरही होता. आम्ही दिल्लीच्या सार्वजनिक शाळांमध्ये सर्वांगीण दृष्टिकोनावर भर देत शैक्षणिक कार्यपद्धतीला आकार देण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालकांच्या भूमिकांचा अभ्यास केला. माध्यमिक विद्यालय लांडेवाडीच्या सहाय्यक शिक्षिका तसेच कोअर टीमच्या सदस्या चारुशीला फुगे म्हणाल्या, दिल्ली शिक्षण विभागाने सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात सामावून घेण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांची व्यावसायिक आणि संभाव्य कौशल्ये विकसित करण्यासाठी काही उपाययोजना राबविल्या आहेत. या अभ्यास दौऱ्यात आम्हाला त्या उपाययोजना जवळून पाहता आल्या.

#### महापालिका शाळांमध्ये बदल घडावा...

**» जाधववाडी बॉईज स्कूलमधील मनिषा सदावर्ते म्हणाल्या, चार-पाच वर्षांपूर्वी दिल्लीतील सरकारी शाळांचे चित्र खूप वेगळे होते, परंतु तेथील प्रत्येक शिक्षकाने स्वत: जबाबदारी घेतली आणि मुलांमध्ये आणि शाळेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. दिल्लीतील शाळांमधील शिक्षकांसोबत पालक आणि अधिकारीही महत्त्वाची भूमिका बजावतात. महापालिका शाळांमध्येही असाच बदल घडावा यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.**

> “ दिल्लीच्या अभ्यास दौऱ्यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यास मदत मिळणार असून या अभ्यासपुर्ण दौऱ्याचा अनुभव कोअर टीमला महापालिका शाळांमध्ये प्रभावी धोरणे आखण्यासाठी आणि नवकल्पना लागू करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. हा सहयोगी प्रयत्न निःसंशयपणे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावेल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त.**

## आर्थिक अपहारप्रकरणी कंत्राटी कर्मचाऱ्यावर कारवाई!

### समितीद्वारे होणार चौकशी : वायसीएम रुग्णालय प्रशासनाने घेतली दखल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'वायसीएम'मधील अत्यावश्यक विभागाच्या 'कॅश काउंटर' वर कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडून दररोज सादर केलेल्या बिलात तफावत आढळली आहे. रुग्णांकडून रोख रक्कम घेऊन रुग्णालय प्रशासनाकडे कमी रक्कम भरली गेल्याची घटना उघडकीस आली आहे. बोगस पावतीद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्याने हे कृत्य केल्याची चर्चा आहे. रुग्णालय प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आल्याने संबंधीत कर्मचाऱ्याची तत्काळ बदली करून प्रशासकीय चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.**




रुग्णालयातील ओपीडी बंद झाल्यानंतर अत्यावश्यक विभागाचे कॅश काउंटर सुरु असते. रुग्णालयातील 44 नंबरच्या एक 'कॅश काउंटर' वर दुपारनंतर नातेवाईकांची सतत वर्दळ असते. दररोज हजारो रुपयाच्या पावत्याद्वारे रोख रक्कम रुग्णालयात जमा होत होती. मात्र, कंत्राटी कर्मचाऱ्याने बोगस पावत्या बनवून हे कृत्य केल्याचे सांगण्यात येत आहे. दुपारी दोन ते रात्री दहा वेळेत रुग्णालयातील कॅश काउंटरवर तो काम करत होता. रुग्णाच्या नातेवाईकांनी रक्त, प्लेटलेट खरेदी संदर्भात दररोज तीन ते नऊ हजार रुपयाच्या पावत्या त्या काऊंटर वर केल्या जात होत्या. गेल्या दहा महिन्यात लाखो रुपयाच्या बोगस पावत्याद्वारे रुग्णालयाच्या रकमेवर त्या कर्मचाऱ्याने डल्ला मारल्याचे स्पष्ट होत आहे. यावर चौकशी करण्यासाठी समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात आर्थिक तफावत आढळली असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे. दोन दिवसात समितीचा अहवाल प्राप्त होऊन पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

> “ कंत्राटी कर्मचाऱ्याने काही चुका केल्या आहेत. आर्थिक तफावत आढळले असल्याचे प्राथमिक तपासणीत स्पष्ट झाले आहे. हे 'कॅश काउंटर' तात्काळ बंद करून त्या कंत्राटी कर्मचाऱ्याची इतर ठिकाणी बदली केली आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार पुढील कारवाई करू.
>
> **- डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, पीजी महाविद्यालय, वायसीएम.**

# डॉ. संजीव ठाकूर यांची पदमुक्ती!

## » मात्र प्रशासन अद्याप आदेशाच्या प्रतिक्षेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील प्रकरणामध्ये ससून रुग्णालय तसेच बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना पदमुक्त करण्याचा निर्णय घेऊन दोन आठवडे उलटले तरी त्याबाबतचे आदेश महाविद्यालय प्रशासनाला मिळालेले नाहीत.**

ललित पाटील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने चौकशी समिती स्थापन केली होती. त्या समितीच्या अहवालामध्ये डॉ. ठाकूर आणि अस्थिव्यंगोपचार विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रवीण देवकाते दोषी आढळले होते. त्यानंतर डॉ. ठाकूर यांना पदमुक्त, तर डॉ. देवकाते यांना निलंबित करण्याचा निर्णय राज्य सरकारने १० नोव्हेंबरला घेतला. या निर्णयानंतर दुसऱ्याच दिवशी डॉ. देवकाते यांना निलंबित केल्याचे आदेश बी. जे. प्रशासनाला प्राप्त झाले. मात्र, ठाकूर यांच्या पदमुक्तीचा आदेश अद्यापही मुंबई-पुणे महामार्गावरच अडकला असल्याची तिरकस चर्चा महाविद्यालयात रंगली आहे.



डॉ. ठाकूर यांची 'बी. जे.'च्या अधिष्ठातापदी नियुक्ती होण्यापूर्वी डॉ. विनायक काळे हे त्या ठिकाणी नियुक्त होते. ठाकूर यांच्या नियुक्तीनंतर डॉ. काळे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) आणि त्यानंतर उच्च न्यायालयात धाव घेतली होती. डॉ. ठाकूर यांच्यावर ललीत पाटील प्रकरणात कारवाई झाली, त्याच दिवशी डॉ. काळे यांच्याबाजूने उच्च न्यायालयात निकाल लागला होता. त्यानुसार त्यांनी 'बी.जे.'च्या अधिष्ठातापदाचा पदभार स्वीकारणे अपेक्षित होते. त्यासाठी राज्य सरकारने ठाकूर यांच्यावरील कारवाई आणि काळे यांची नव्याने नियुक्ती, असे आदेश देणे अपेक्षित होते. सरकारकडून ठाकूर यांच्यावरील कारवाईचे आदेश मंत्रालयातून प्रसिद्ध केले असले तरी ते अद्यापपर्यंत 'बी. जे.'ला मिळालेले नाहीत. तर, डॉ. काळे यांच्या नियुक्तीचे आदेशच काढले नसल्याने त्यांचीही नियुक्ती करण्यात आली नाही. बी. जे. महाविद्यालयातील वरिष्ठ अधिकारी म्हणून डॉ. श्रीनिवास शित्रे यांच्याकडे अधिष्ठातापदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे; परंतु शित्रे रजेवर असल्याने उपअधिष्ठाता डॉ. शेखर प्रधान यांना अधिष्ठातापदाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.

सद्यस्थितीत 'बी. जे.' प्रशासनामध्ये अधिष्ठाता पदावरून संभ्रम असल्याचे दिसून येत आहे. या गोंधळाचा ससूनसह बी. जे. रुग्णालय प्रशासनावर परिणाम होत असून रुग्णसेवेलाही त्याचा फटका बसतो आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना पदमुक्त करण्यात आले आहे. या निर्णयाचा आदेश महाविद्यालय प्रशासन आणि डॉ. ठाकूर यांना पाठविण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना दिलेल्या आदेशाची प्रत प्रशासनाला मिळाली असेल. महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापकाला अधिष्ठातापदाचा पदभार द्याव्या, अशा सूचनादेखील डॉ. ठाकूर यांना पदमुक्त करताना दिल्या होत्या, असे वैद्यकीय शिक्षण विभाग सचिव दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

### अधिष्ठाता पदावरुन संभ्रम

» अधिष्ठातापदी नियुक्ती होण्यापूर्वी डॉ. विनायक काळे हे त्या ठिकाणी नियुक्त होते. ठाकूर यांच्या नियुक्तीनंतर डॉ. काळे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) आणि त्यानंतर उच्च न्यायालयात धाव घेतली होती. डॉ. ठाकूर यांच्यावर ललीत पाटील प्रकरणात कारवाई झाली, त्याच दिवशी डॉ. काळे यांच्याबाजूने उच्च न्यायालयात निकाल लागला होता. त्यानुसार त्यांनी 'बी. जे.'च्या अधिष्ठातापदाचा पदभार स्वीकारणे अपेक्षित होते. त्यासाठी राज्य सरकारने ठाकूर यांच्यावरील कारवाई आणि काळे यांची नव्याने नियुक्ती, असे आदेश देणे अपेक्षित होते. सरकारकडून ठाकूर यांच्यावरील कारवाईचे आदेश मंत्रालयातून प्रसिद्ध केले असले तरी ते अद्यापपर्यंत 'बी. जे.'ला मिळालेले नाहीत. तर, डॉ. काळे यांच्या नियुक्तीचे आदेशच काढले नसल्याने त्यांचीही नियुक्ती करण्यात आली नाही.

# जलमापकास विरोध केल्यास कारवाई

## » विरोध करणाऱ्यांवर थेट पोलीस कारवाई

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महत्त्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलमापक बसविण्यास शहरात विरोध होत आहे. मात्र, आता विरोध करणाऱ्यांवर थेट पोलीस कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे आता जलमापक बसविण्यास विरोध करणे नागरिक, गृहनिर्माण सोसायट्यांना महागात पडणार आहे.**

शहराला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा, पाणी वितरणातील त्रुटी दूर व्हाव्यात, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. या योजनेची कामे तीन टप्प्यांत सुरू असून, नव्याने १८०० किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकणे, तसेच जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांची दुरुस्ती, निवासी आणि व्यावसायिक मिळकतींना जलमापक बसविणे आणि साठवणूक टाक्यांची उभारणी करणे, अशा तीन टप्प्यांत ही कामे समांतर पद्धतीने सुरू आहेत. महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजनेचे काम सन २०१७ मध्ये सुरू केले. आतापर्यंत ६२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या योजनेतून सोसायट्या, बंगल्यांमध्ये तीन लाख १८ हजार जलमापक बसविण्यात येणार आहेत. ज्या भागातील पाणी पुरवठा वितरणाच्या यंत्रणेचे काम पूर्ण झाले आहे, अशा सोसायट्या, बंगल्यांना जलमापक बसविण्याचे काम सुरू असून, आतापर्यंत एक लाख ३४ हजार ५८० जलमापक बसविण्यात आले आहेत. सध्या शहराचा मध्यवर्ती भाग, सहकारनगर, पर्वती, कात्रज, धनकवडी, सिंहगड रस्ता, शिवाजीनगर, कोथरूड, कर्वेनगर, वारजे आदी या भागात जलमापक बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामध्ये मध्यवर्ती भाग, सहकारनगर, कात्रज भागात जलमापक बसविण्याच्या कामास राजकीय पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते विरोध करत आहेत.



### जलमापकाचे किरकोळ कामे बाकी

» गृहनिर्माण सोसायट्यांचे पदाधिकारीही विरोध करत आहेत. पाणीपुरवठा विभागाने योजनेबाबत माहिती देऊनही विरोध होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, समान पाणीपुरवठा योजनेचे ४० विभागांतील बहुतांश काम पूर्ण झाले आहे. तेथे जलमापक बसविण्यासह किरकोळ कामे बाकी आहेत. पण काही नागरिक जलमापक बसविण्यास विरोध करत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात पोलीस तक्रार करण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सोमवारी स्पष्ट केले.

# ट्राफिकची चिंता दूर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येणाऱ्या रिंग रोडसाठी हवेली आणि मावळ तालुक्यात सर्वाधिक भूसंपादन झाले आहे. या रिंगरोडसाठी सुमारे १६०० एकरचे निवाडे जाहीर झाले आहेत. त्यासाठी आतापर्यंत सुमारे १७२० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे पूर्व भागातील रिंगरोडसाठी गती येण्याची चिन्हे आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराभोवतीचा रिंगरोड हा मावळ, खेड, हवेली, भोर आणि पुरंदर या पाच तालुक्यांमधून जाणार आहे. या रिंगरोडसाठी पश्चिम भागातून ३४ आणि पूर्व भागातील ४६ गावांमधील सुमारे १७४० हेक्टर संपादित करावी लागणार आहे. पूर्व भागातून ८८५ हेक्टर आणि पश्चिम भागातील ७१६ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. पश्चिम भागातील रिंगरोडची रचना बदलल्याने तीन गावांची भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित आहेत. त्यात मुळशी तालुक्यातील कासार आंबोली, हवेली तालुक्यातील प्रयागधाम आणि भोर तालुक्यातील खोपी या गावांचा समावेश आहे. रिंगरोडसाठी पश्चिम भागातील सुमारे ६३० हेक्टरचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. त्यापैकी संमतीने २६० हेक्टर तसेच सक्तीने ३७० हेक्टर क्षेत्राचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. त्यामुळे ६३० हेक्टर क्षेत्राचे म्हणजेच सुमारे १६०० एकर क्षेत्राचे भूसंपादन झाल्याचे मानले जात आहे. त्यामुळे रिंग रोडच्या पुढच्या प्रक्रियेला गती येण्याची चिन्हे आहेत. ६३० हेक्टरसाठी जिल्हा प्रशासनाने आतापर्यंत १७२० कोटी रुपयांचा निधी वाटप केला आहे. पूर्व रिंगरोडसाठी ४८ गावांमधील जागा संपादित करण्यात येणार आहे. मावळमधील ११, खेडगावमधील १२, हवेलीतील १५ आणि पुरंदर तालुक्यातील ७ आणि भोरमधील तीन अशा गावांमधून जात आहे. त्यापैकी खेडमधील १२ आणि हवेली तालुक्यातील चार अशा १६ गावांचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत.

# तळवडे- मोशी वाहतूक कोंडी सुटणार!

## मोशी शिवरस्ता रस्त्याचे भूमिपूजन : आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे ते मोशी रोडवरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मोशी शिवरस्ता ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल, असा शब्द स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांना दिला होता. महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. वर्षभरात रस्त्याचे काम पूर्ण होईल. त्यामुळे औद्योगिक पट्ट्यासह निवासी क्षेत्रातील नागरिक, वाहनचालकांना 'ट्रॅफिकमुक्त' प्रवास करता येईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**



मोशी येथे आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते प्रस्तावित रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, उद्योजक संतोष बारणे, निलेश बोराटे, निखिल बोऱ्हाडे, संतोष जाधव, सागर हिंगणे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, नागरिक आणि सोसायटीधारक उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापत्य विभागाकडून प्रभाग क्रमांक २ मोशी गट नं. १२५२ शिवरस्ता ते गट नं. ७५२ (पुणे नाशिक हायवे) पर्यंतच्या ३० मीटर रुंद डी.पी. रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. मोशी ते देहू फाटा दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या होती. त्यामुळे हा रस्ता विकसित करण्याची आवश्यकता होती.

### शेतकरी, सोसायटीधारकांना दिलासा

» माजी महापौर राहुल जाधव माजी महापौर राहुल जाधव म्हणाले की, मोशी शिवरस्ता ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण केल्यामुळे मोशी ते देहू फाटाहून चिखलीच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना होणारी वाहतूक कोंडीची त्रास कमी होईल. दळणवळण वाढणार असून स्थानिक शेतकरी आणि सोसायटीधारकांनाही रस्ता उपलब्ध होणार आहे. तसेच, चिखली-हवालदार वस्तीमार्गे आखणी एक नवीन रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात हा रस्ता चिखली-मोशी रस्त्याला समांतर रस्ता म्हणून उपयोगात येईल.

# चंद्ररंग ट्रस्टचा व्यावसायासाठी युवकांना 'आधार'

## व्यवसायात सचोटी अन् प्रामाणिकपणा जपा : ट्रस्टचे सचिव विजय जगताप यांचे मार्गदर्शन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'तुझं व्यवसाय हा एका दिवसात निर्माण होत नाही. व्यवसायाला मोठे करण्यासाठी अपार मेहनत घेवून त्यात सातत्य ठेवावे लागते. व्यावसायिक वाटचालीमध्ये सगळेच दिवस सारखे नसतात. अपयशाने खचून न जाता सचोटीने आपला व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. या संघर्षातूनच यशस्वी उद्योजक निर्माण होत असतो, असे मार्गदर्शन चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव विजय जगताप यांनी केले.**



चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट ही शहरातील नामांकित सेवाभावी संस्था आहे. आरोग्य शिबीर, तरुणांना स्वयंरोजगारासाठी मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी मदत असे विविध उपक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात येतात. आता ट्रस्टच्या वतीने सचिन येडे, स्वाती राऊत, दिलीप खंदारे, अखिल चिंचवडे यांना अंडाभुर्जीची गाडी उपलब्ध करून दिली आहे. या गाड्यांचे वाटप पिंपळे गुरव येथे ट्रस्टचे सचिव विजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे खजिनदार अमोल उंद्रे, एन.एसी.सी. समन्वयक तथा वेंकीजचे सरव्यवस्थापक प्रसन्न पेडगावकर, मनीष कुलकर्णी, योगेश चिंचवडे, दिपक भोंडवे, सोमनाथ भोंडवे, अनुराग चिंचवडे, भूषण चिंचवडे, सौरभ गावडे, राहुल चिंचवडे, सिद्धार्थ शेलार, कुणाल भोंडवे, विकी गायकवाड, दिनेश कनेटकर उपस्थित होते.

विजय जगताप म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारच्या वतीने स्वयंरोजगारासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी केंद्र सरकारच्या वतीने विविध योजनाही आहेत. यातून प्रेरणा घेवून आम्ही युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा. यासाठी हा उपक्रम हाती घेतला. एका परिवाराने व्यवसायाला सुरुवात केली, तर त्यातून प्रेरणा घेवून इतर तरुणही व्यावसायात उतरतील, असा विश्वास वाटतो.

> “ मराठी युवकांनी व्यवसायात उतरले पाहिजे. व्यवसाय वाढविण्यासाठी सातत्याने नवीन कल्पना व्यावसायात आणल्या पाहिजेत. यामुळे व्यवसाय यशस्वी होतो. एक व्यावसायिक आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून संपूर्ण कुटुंब सावरू शकतो. कोणताही व्यवसाय एकाच दिवसात मोठा होत नाही. यासाठी सातत्याने कष्ट आणि मेहनत घेतल्यास एक दिवस हे तरुण नक्कीच स्वाभिमानी उद्योजक होवू शकतील.
>
> -विजय जगताप, सचिव, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट.




# ...यांचे सध्याचे हिंदूत्व 'डीपफेक'!

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर कारवाईची मागणी करणाऱ्या उद्धव ठाकरेंनी आपली यापुढील राजकीय कारकीर्द सोनिया गांधींची काँग्रेस आणि पवारसाहेब यांच्या इशाऱ्यानुसार चालत राहणार हेच ठरवले आहे का, अशी शंका भाजपच्या वतीने घेणारे टिपण..**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून मध्य प्रदेशातील एका प्रचारसभेत अयोध्या दर्शनासंदर्भात झालेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे यांना अचानक हिंदूत्वाचे स्मरण झाले. १९८७ मधील विलेपार्ले विधानसभा पोटनिवडणुकीत प्रचारावेळी 'हिंदूत्व' शब्दाचा वापर केल्यामुळे शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार त्या वेळच्या निवडणूक आयोगाने सहा वर्षांसाठी काढून घेतला होता. त्या वेळी जो न्याय वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना लावला होता तो केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना लावणार का, असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला आहे. यानिमित्ताने उद्धव ठाकरेंना वंदनीय बाळासाहेब आणि बाळासाहेबांच्या विचारांची आठवण झाली, हेही नसे थोडके! याचे कारण नोव्हेंबर २०१९ पासून उद्धव ठाकरेंना वंदनीय बाळासाहेबांच्या प्रखर हिंदूत्ववादी विचारांचा पूर्णपणे विसर पडला आहे. मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी उद्धव ठाकरेंना काँग्रेस आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या समोर वंदनीय बाळासाहेबांच्या ज्वलंत हिंदूत्वाच्या विचारसरणीच्या शस्त्रांचे समर्पण करावे लागले. हिंदूत्वाला कायमची सोडचिठ्ठी द्यायची या बोलीवरच काँग्रेस आणि पवारसाहेबांनी उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री बनवले होते, हा इतिहास आहे. हा इतिहास उद्धव ठाकरे यांना कदापि पुसून टाकता येणार नाही. सोनिया गांधींची काँग्रेस आणि शरद पवार यांच्या समोर लोटांगण घालावे लागलेल्या उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री असताना आणि त्यानंतरही हिंदूत्वाचा सोयीस्कर विसर पडल्याची अनेक उदाहरणे आहेत. डिसेंबर १९८७ मध्ये विलेपार्ले विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. त्या वेळी विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराने अयोध्येत राम मंदिर उभारणीसाठी देशव्यापी आंदोलन सुरू केले होते. 'सौगंध राम की खाते है, मंदिर वहीं बनाएंगे' ही घोषणा त्या वेळी संपूर्ण भारतवर्षात दुमदुमू लागली होती. वंदनीय बाळासाहेबांनी राम जन्मभूमीवर प्रभू रामचंद्राच्या मंदिर उभारणीला नि:संदिग्ध पाठिंबा जाहीर केला होता. राम मंदिरासाठीचे आंदोलन, शाहबानो खटला याचा उल्लेख करत वंदनीय बाळासाहेबांनी त्या वेळी हिंदूत्वाचा जागर सुरू केला होता. हिंदूत्वाचा वापर प्रचारात केल्यामुळे विलेपार्ले विधानसभा पोटनिवडणूक जिंकणारे डॉ. रमेश प्रभू यांची निवड न्यायालयाने रद्द ठरवली. मात्र वंदनीय बाळासाहेबांनी आपला हिंदूत्वाचा वसा अखेरच्या श्वासापर्यंत सोडला नाही. १९९२-९३ मध्ये मुंबईत झालेल्या धार्मिक दंगली, दाऊद इब्राहिमने पाकिस्तानच्या मदतीने मुंबईत केलेले बॉम्बस्फोट या सर्व घटनाक्रमामध्ये वंदनीय बाळासाहेबांचे हिंदूत्ववादी विचार झळाळून उठले होते. क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी बाळासाहेबांनी हिंदूत्वाचा विचार कुणाकडे गहाण टाकला नव्हता. याउलट उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदावर राहण्यासाठी हिंदूत्वाचा विचार विसरणे भाग पडले होते. ते मुख्यमंत्री असताना शर्जील उस्मानी याने महाराष्ट्रात येऊन हिंदू धर्मावर गरळ ओकली होती. त्याच्या मुसक्या आवळण्याची हिंमत उद्धव ठाकरेंनी दाखवली नव्हती. शर्जील उस्मानीचा कडाडून निषेध करण्याचे धैर्यही उद्धव ठाकरेंना दाखवता आले नव्हते. सत्तेसाठी असे अगतिक, दयनीय झालेले उद्धव ठाकरे आता हिंदूत्वाबद्दल बोलत आहेत, हा नियतीने त्यांच्यावर उगवलेला सूडच म्हणावा लागेल. वंदनीय बाळासाहेबांनी राम मंदिरनिर्मितीबरोबरच काश्मीरसाठीचे ३७० वे कलम रद्द करण्याच्या मागणीला आणि देशात समान नागरी कायदा लागू करण्याच्या मागणीला नेहमीच पाठिंबा दिला होता. अलीकडे समान नागरी कायद्याबाबत देशभर चर्चा सुरू झाल्यानंतर उद्धव ठाकरेंची प्रतिक्रिया आली. या कायद्याला खणखणीत पाठिंबा देण्याऐवजी उद्धव ठाकरे काय म्हणाले हे त्यांच्याच शब्दांत पाहा.. "देशातील लोकांनाही हाच प्रश्न पडला आहे की, समान नागरी कायदा म्हणजे काय? समान नागरी कायद्याचा अर्थ कुणाच्या लग्नापुरता ठेवायला आणणार असाल तर तो भाग वेगळा. कायद्यापुढे सगळे समान असतील तर तुमच्यातल्या भ्रष्टाचाऱ्यांनासुद्धा शिक्षा झालीच पाहिजे.



## संपादकीय »

### सातत्य

***भारतीय संघ सर्वच्या सर्व सामने मोठ्या फरकाने जिंकला; पण अंतिम फेरीत हरला. केवळ तेवढ्यामुळे भारतीय संघास कमी लेखता येणार नाही***

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीचा निकाल ऑस्ट्रेलियासाठी एका अर्थी अपेक्षित आणि आपल्यासाठी अनेकार्थी अनपेक्षित म्हणावा लागेल. सलग दहा सामने जिंकून अंतिम फेरीत दिमाखात दाखल झालेला भारतीय संघ विरुद्ध अडखळत्या सुरुवातीनंतर प्रत्येक सामन्यागणिक आपली कामगिरी उंचावत नेणारा ऑस्ट्रेलियन संघ यांच्यातील लढत एकतर्फी होईल असे अनेकांनी गृहीत धरले. दुर्दैवाने या अनेकांत आयुष्यात कोणत्याही खेळाशी आणि खिलाडूवृत्तीशी संबंध नसलेल्यांचेच प्राधान्य अधिक. त्यामुळे सामना सुरू होण्याआधीपासूनच या मंडळींनी वाजंत्रीवाल्यास 'वाजवा रे वाजवा' म्हणायचे तेवढे बाकी ठेवले होते. खरे तर आधीच्या सर्व विश्वचषक स्पर्धातील भारतीय संघांच्या तुलनेत आताचा आपला संघ सर्वोत्तम होता. तर याआधी विश्वचषक जिंकलेल्या सर्व ऑस्ट्रेलियन संघांच्या तुलनेत विद्यमान संघ नि:संशय कमकुवत होता.

**बांगलादेशातील सार्वत्रिक निवडणूक ७ जानेवारीला होणार असल्याची घोषणा नुकतीच झाली. बंगबंधू शेख मुजीबुर रेहमान यांच्या कन्या आणि विद्यमान पंतप्रधान शेख हसीना वाजेद याच सलग चौथ्यांदा पंतप्रधान होणार हे जवळपास निश्चित आहे. बांगलादेशात आज प्रभावी विरोधी पक्ष नाही. एके काळी बांगलादेशाचे राजकारण अवामी लीगच्या शेख हसीना आणि बांगलादेश नॅशनल पार्टीच्या (बीएनपी) खालेदा झिया यांच्याभोवतीच फिरत असे.**

# शेख हसीनांशिवाय आहेच कोण?

आता शेख हसीना बांगलादेशच्या सर्वात मोठ्या नेत्या आहेत. निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीपासूनच बांगलादेशात राजकीय वातावरण तापू लागले होते. विरोधी 'बीएनपी'ने 'शेख हसीना यांनी राजीनामा द्यावा आणि 'हंगामी तटस्थ सरकार'च्या नेतृत्वाखाली निवडणुका व्हाव्यात' या मागणीसाठी २८ ऑक्टोबरपासूनच आंदोलन सुरू केले. अमेरिका व अन्य पाश्चिमात्य देशांनाही ही निवडणूक महत्त्वाची वाटत असून 'निवडणुका निष्पक्ष, न्याय्य आणि मुक्त वातावरणात व्हाव्यात' अशी अपेक्षा त्या देशांनी व्यक्त केली आहे. बीएनपी आणि अन्य विरोधी पक्षांच्या आंदोलनात काही तरुणांनी जीव गमावले आहेत. त्यामुळेच बीएनपीचे अब्दुल मोमीन खान यांचे 'या निवडणुकीचा निकाल काय असणार हे बांगलादेशच्या सर्वांना माहीत आहे,' हे उद्गार लक्षवेधी ठरतात. भारत आणि बांगलादेशात ऐतिहासिक आणि जुने संबंध आहेत. १९७१



मध्ये बांगलादेश स्वतंत्र झाला त्यात भारताचा मोठा वाटा होता. ढाका येथे पाकिस्तानच्या लष्कराने भारताच्या लष्करी अधिकाऱ्यांसमोर १६ डिसेंबर १९७१ ला शरणागती पत्करली होती. पाकिस्तानने शेख मुजीबुर रेहमान यांना कैदेतून मुक्त केल्यानंतर लंडनमार्गे बांगलादेशला जाण्यापूर्वी मुजीबुर रेहमान काही तास दिल्लीत थांबले होते. विमानातून उतरताना त्यांनी 'जोय बांगला' अशी घोषणा दिली होती. तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि त्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळ दिल्ली विमानतळावर या 'बंगबंधूं'च्या स्वागतासाठी उपस्थित होते. पुढे १४-१५ ऑगस्ट १९७५ च्या रात्री शेख मुजीबुर रेहमान आणि त्यांच्या कुटुंबाची हत्या करण्यात आली. शेख हसीना तेव्हा जर्मनीत असल्यामुळेच वाचल्या. मग भारतात येऊन, इथून १७ मे १९८१ रोजी त्या बांगलादेशात परतल्या, त्या पक्षाचे नेतृत्व करण्यासाठीच. आजही दक्षिण आशियात भारताचा सर्वात जवळचा मित्र बांगलादेश आहे. शेख हसीना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातही चांगली मैत्री आहे. ३० ऑक्टोबरला दिल्लीत वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या (डब्ल्यूएचओ) झालेल्या बैठकीत दक्षिण पूर्व आशियाच्या विभागीय संचालक म्हणून शेख हसीना यांच्या कन्या सायमा वाजेद निवडून आल्या. भारताने सायमा यांच्या बाजूने मतदान केलं होतं. शेख हसीना यांनी बांगलादेशच्या विकासाचा भारत 'सर्वात मोठा भागीदार' असल्याचे म्हटले आहे. विरोधी 'बीएनपी'चा सर्वात मोठा सहकारी पक्ष जमात-ए-इस्लामी आहे. बीएनपी आणि 'जमात' धर्माचे राजकारण करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गृहमंत्री म्हणून फडणवीस नापास!

## » सुषमा अंधारेंची देवेंद्र फडणवीसांवर बोचरी टीका

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**महाराष्ट्रात विविध प्रकारच्या गुन्हेगारी घटना घडत आहेत. अकोल्यातल्या पीडित मुलीला आम्ही शिवसेनेच्या वतीने भेटलो. महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढली असून गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे पूर्णपणे नापास झाले आहेत अशी टीका शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली.**



आज सकाळी आलेली बातमी अस्वस्थ करणारी आहे. येरवडा तुरुंगातला कुख्यात गुंड आशिष फरार झाल्याची बातमी आली आहे. आम्ही वारंवार तुरुंग प्रशासन, पोलीस खातं आहे त्यांच्या त्रुटी दाखवण्याचा प्रयत्न करतो आहे. मात्र अडचण अशी होते आहे की कैद्यांकडून पाकिटं घेऊन पोलीसच त्यांना कशी मदत करतात याचा व्हिडीओ पोस्ट केला तरीही कारवाई झालेली नाही. ड्रग्ज रॅकेट प्रकरणात डीन संजीव ठाकूर यांच्या नार्को चाचणीची मागणी आम्ही केली आहे. डीन संजीव ठाकूर कुणाच्या आशीर्वादाने बाहेर आहेत हे सरकारने सांगितलं पाहिजे. पोलीस खातं काय पद्धतीने काम करतं आहे? कायदा सुव्यवस्था आपल्या राज्यात आहे का? कारण महिलांविषयीचे गुन्हे वाढले आहेत असंही सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. सगळंच पोलिसांनी पाहायचं का? मुलींनी आत्मनिर्भर कधी व्हायचं असं जर सत्ताधारी पक्षातल्या महिला बोलत असतील तर त्यांनी लक्षात घ्यावं की डिसेंबर २०२२ पासूनच्या घटना मी सांगितल्या आहेत. मी त्यांचा पाठपुरावा करते आहे. त्या सगळ्या घटना शाळकरी मुलींसह घडल्या आहेत, एक घटना अंध मुलीसह घडली आहे. यात विशेष बाब म्हणजे या संपूर्ण कालावधीत पालकमंत्री म्हणून राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस होते. देवेंद्र फडणवीस पालकमंत्री असतानाही महिलांवर अत्याचार झाले. आता सत्ताधारी पक्षातल्या महिला पुढारी सांगत आहेत की सगळंच पोलिसांवर आणि सरकारवर कसं सोडता? मला सांगा पाच आणि सात वर्षांच्या मुलींनी कसं आत्मनिर्भर व्हायचं? कल्याणमध्ये आम्ही जेव्हा सात वर्षांच्या मुलीच्या कुटुंबीयांना भेटायला गेलो तेव्हा त्या चिमुकलीच्या फोटोसमोर नैवेद्य म्हणून मॅगी, चॉकलेट आणि फ्रुटी ठेवले होते. इतक्या छोट्या बाळांवर अत्याचार होतात, हत्या होतात गृहखातं काय करतं आहे? सराईत कैद्यांना सरकारी जावई असल्यासारखं वागवलं जातं आहे. आजच्या येरवड्याच्या घटनेमुळे पुन्हा एकदा गृहखात्याचे वाभाडे निघाले आहेत. राज्यातल्या गृहखात्याचा वचक उरलेला नाही. कारागृह निरीक्षक, महानिरीक्षक हे काय करत आहेत? गंभीर गुन्ह्यांचे आरोपी असणाऱ्यांकडे मोबाइल कसे जातात? त्यांना सोयी सुविधा कशा मिळतात? तुरुंग हे कैद्यांचं नंदनवन व्हायला कारणीभूत कोण आहे? याचं उत्तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं पाहिजे.

### आरक्षणावरुन जाती-जातीत भांडणे

» राज्यातील युवक ड्रग्सच्या आहारी गेल्याने त्यांचे भविष्य अंधकारमय असून ड्रग्सची चौकशी थंडबस्त्यात आहे. संजीव कुमार हे दोषी असूनही त्यांना अटक होत नाही, त्यांच्यावर विशेष मेहरबानी कुणाची? राज्यातील महिलाच नव्हे चिमुरड्या बालिकाही सुरक्षित राहील्या नाहीत. नेत्यांची घरे जाळली जातात, त्यावर गृहमंत्री बोलत नाहीत. निष्ठावान शिवसैनिकांवर गुन्हे दाखल करण्यासाठीच पोलीस खात्यांचा वापर केला जात आहे. आरक्षणाचा प्रश्न मुलभुत हक्काशी निगडीत असल्यामुळे त्यावर संसदेतूनच तोडगा निघू शकतो. मात्र जाती-जातीत तेढ निर्माण न करता जर भाजपला आरक्षण द्यायचे असेल तर संसदेत बहुमत असल्यामुळे भाजपने ते दिले पाहीजे. भाजपाकडे कोणतेच मुद्दे उरले नसल्यामुळे हे मुददे बाजूला सारुन आरक्षणाचा मुद्दा पुढे केला जात आहे, असेही त्या म्हणाल्या.

# विठ्ठल रुक्मिणीची महापूजा फडणवीस यांच्या हस्ते

## »मराठा समाजाची पंढरपूर शासकीय विश्रामगृहात बैठक

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते होत असते. परंतु सकल मराठा समाजाने या शासकीय महापूजेला विरोध केल्याने पेच निर्माण झाला होता. जिल्हा प्रशासनाने सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून समाजाच्या पाचही मागणी मान्य केल्याने मराठा समाजाने आंदोलन मागे घेतले असून दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी कार्तिकी यात्रेनिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.**



पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे जिल्हा प्रशासन व सकल मराठा समाजाचे शिष्टमंडळ यांची संयुक्त बैठक घेण्यात आली, त्याप्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले,मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव तसेच सकल मराठा समाजाचे प्रतिनिधी व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींनी कुणबी जातीच्या नोंदी वेगाने शोधणे, मराठा भवन बांधणे, सारथीचे उपकेंद्र सुरू करणे, मराठा विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधणे व मराठा आरक्षणासंदर्भात चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री यांचा वेळ मिळणे या मागण्या करण्यात आल्या. त्यावर जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मराठा समाजाने केलेल्या उपरोक्त पाचही मागण्या तात्काळ मान्य केल्या. प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेच्या अनुषंगाने सकल मराठा समाजाने उपमुख्यमंत्री यांना शासकीय महापूजा करण्यास केलेला विरोध व आंदोलन मागे घेतले असून शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपमुख्यमंत्री हे कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे समाजाच्या वतीने सांगण्यात आले. मराठा समाजाचे आंदोलन मागे घेण्याबाबत महत्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील कुणबी पुरावे नोंदी गोळा करण्याची मोहीम गतीने सुरू असून त्यात अधिक गती यावी यासाठी सर्व संबंधित तहसीलदार व प्रांताधिकारी यांना सुचित करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. त्याप्रमाणेच पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी पालकमंत्री यांच्याशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच प्रांताधिकारी यांना मराठा भवनसाठी जागा शोधण्याबाबत ही कळविण्यात आले असून बांधकामासाठी निधीची ही तरतूद करण्याचे प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले.

### नोंदी गोळा करण्याची मोहीम गतीने

» जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधीशी दुसऱ्यांदा बैठक घेऊन मराठा समाजाचे आंदोलन मागे घेण्याबाबत महत्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील कुणबी पुरावे नोंदी गोळा करण्याची मोहीम गतीने सुरू असून त्यात अधिक गती यावी यासाठी सर्व संबंधित तहसीलदार व प्रांताधिकारी यांना सुचित करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. त्याप्रमाणेच पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी पालकमंत्री यांच्याशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच प्रांताधिकारी यांना मराठा भवनसाठी जागा शोधण्याबाबत ही कळविण्यात आले असून बांधकामासाठी निधीची ही तरतूद करण्याचे प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले.

# ईडीचा सोनिया गांधींना धक्का!

## AJL आणि यंग इंडियनची 750 कोटींची मालमत्ता जप्त

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नॅशनल हेराल्ड प्रकरणी ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपाखाली मोठी कारवाई केली आहे. काँग्रेसशी संबंधित 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड' (ASSOCIATED JOURNALS LIMITED (AJL)) आणि यंग इंडियन (YOUNG INDIAN) यांची 751.9 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेपैकी एजीएलकडे दिल्ली, मुंबई आणि लखनौसह अनेक ठिकाणी मालमत्ता आहेत. त्याची एकूण किंमत 661.69 कोटी रुपये आहे.**

यंग इंडियन कंपनीचे 38 टक्के शेअर्स सोनिया गांधींकडे आहेत आणि तितकेच शेअर्स राहुल गांधींकडे आहेत. यंग इंडियन ही तीच कंपनी आहे, जी असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड म्हणजेच एजेएलने टेकओव्हर केली होती. कंपनी हस्तांतरणाच्या व्यवहारात मनी लॉंड्रिंग झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांची ईडीने मागील वर्षी चौकशी केली होती. नॅशनल हेराल्ड मनी लॉंडरिंग प्रकरणात गेल्या काही महिन्यांत ईडीने काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि पवन बन्सल यांसारख्या वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची चौकशी केली आहे. या प्रकरणी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची अनेक दिवस चौकशी करण्यात आली. नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी



1938 साली हे वृत्तपत्र सुरू केले होते. हे वृत्तपत्र चालवण्याची जबाबदारी 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड' (एजेएल) नावाच्या कंपनीकडे होती. या कंपनीवर सुरुवातीपासून काँग्रेस आणि गांधी घराण्याचे वर्चस्व होते. तब्बल 70 वर्षांनंतर 2008 मध्ये हे वृत्तपत्र तोट्यात गेल्यामुळे बंद करावे लागले. त्यानंतर काँग्रेसने पक्ष निधीतून एजेएलला 90 कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले. मग सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी 2010 मध्ये 'यंग इंडियन' नावाची नवी कंपनी स्थापन केली. असोसिएटेड जर्नल्सला दिलेल्या कर्जाच्या बदल्यात यंग इंडियनला कंपनीत 99 टक्के हिस्सा मिळाला. सोनिया आणि राहुल गांधी यांची यंग इंडियन कंपनीत 38-38 टक्के हिस्सेदारी आहे. बाकीचा हिस्सा मोतीलाल बोरा आणि ऑस्कर फर्नांडिस यांच्याकडे होता. नॅशनल हेराल्ड प्रकरणामुळे राहुल गांधी यांना ईडीच्या चौकशीला सामोरे जावे लागले आहे. 2012 मध्ये सुब्रमण्यम स्वामी यांनी या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात खटला दाखल केला होता. "यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडने 90.25 कोटी रुपये वसूल करण्याचे अधिकार मिळवण्यासाठी फक्त 50 लाख रुपये भरले होते. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याशिवाय या प्रकरणात आणखी चार जणांना आरोपी करण्यात आले होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, पत्रकार सुमन दुबे आणि सॅम पित्रोदा अशी या प्रकरणात आरोप करण्यात आल्यांची नावे आहेत. यातील दोन आरोपी मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस यांचे निधन झाले आहे.

### मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल

» स्वामी यांनी दाखल केलेल्या दाव्यात काँग्रेस नेत्यांनी कोट्यवधींची मालमत्ता बळकावल्याचा आरोप केला आहे. जून 2014 मध्ये न्यायालयाने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधात समन्स जारी केले. यानंतर ऑगस्टमध्ये ईडीने या प्रकरणाची दखल घेत मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता. सोनिया आणि राहुल गांधी यांना 2015 मध्ये दिल्लीच्या पटियाला कोर्टातून 50,000 रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मिळाला होता. त्यानंतर 2016 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सर्व आरोपींना वैयक्तिक हजेरीतून सूट दिली, परंतु या प्रकरणी सुरू असलेली कार्यवाही रद्द करण्यास नकार दिला.

# हा पनौती तिकडे गेला आणि भारत हरला

## राहुल गांधींची पंतप्रधान मोदींवर टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पीएम मोदी (NARENDRA MODI) म्हणजे पनौती मोदी आहेत, भारतीय टीम (TEAM INDIA) चांगलं खेळत होती, पण हे पनौती तिकडे गेले आणि आपल्या टीमला हरवलं अशी जळजळीत टीका काँग्रेसचे खासदार राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांनी केली आहे. ते राजस्थानमधील एका प्रचारसभेत बोलत होते.**

नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट्सने हरवलं. पूर्ण स्पर्धेत चांगली कामगिरी करूनसुद्धा अंतिम सामन्यात भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेला सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः उपस्थित होते. त्यानंतर



### उद्योगपतींचे 14 लाख कोटी रुपये माफ

» नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, "ते नुसता लोकांना भुलवतात. कधी इकडे नेतात तर कधी तिकडे नेतात. त्यांच्या धोरणाचा फायदा देशातल्या काही उद्योगपतींनाच झाला आहे. गेल्या नऊ वर्षांच्या कालावधीत मोदींनी देशातल्या दहा ते पंधरा उद्योगपतींचे 14 लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केलं. आता त्या उद्योगपतींमध्ये कोण गरीब होतं? कोण मागासलेलं होतं?" नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट्सने हरवलं. पूर्ण स्पर्धेत चांगली कामगिरी करूनसुद्धा अंतिम सामन्यात भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेला सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः उपस्थित होते.

आता त्यांच्यावर राहुल गांधी यांनी टीका केली आहे. राहुल गांधी म्हणाले की, पीएम मोदी म्हणजे पनौती मोदी, ते सामना पाहायला गेले आणि भारतीय संघ हरला. आपला संघ चांगली कामगिरी करत होता, पण पनौती तिकडे गेले आणि भारतीय संघाला हरवलं. नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, "ते नुसता लोकांना भुलवतात. कधी इकडे नेतात तर कधी तिकडे नेतात. त्यांच्या धोरणाचा फायदा देशातल्या काही उद्योगपतींनाच झाला आहे. गेल्या नऊ वर्षांच्या कालावधीत मोदींनी देशातल्या दहा ते पंधरा उद्योगपतींचे 14 लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केलं. आता त्या उद्योगपतींमध्ये कोण गरीब होतं? कोण मागासलेलं होतं?" जातीय जनगणनेवर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, "मी संसदेत बोलताना जातीय जनगणनेचा मुद्दा उपस्थित केला आणि सरकारने मागासवर्गीयांसाठी काम करण्याची मागणी केली. देशातल्या 50 टक्क्यांहून जास्त लोक हे मागासलेले आहेत. त्यांची जनणा झाली पाहिजे. नरेंद्र मोदी हे जिकडे जातात तिकडे सांगतात की ते ओबीसी आहेत म्हणून. मग जातीय जनगणना करायला काय अडचण आहे?

# लसीमुळेच तरुणांमध्ये वाढतोय मृत्यूचा धोका?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अख्ख्या जगात हाहाकार माजवला. संपूर्ण जग कोरोनाच्या विळख्यात अडकलं होतं. जगभरातील शास्त्रज्ञांनी दिवस रात्र एक करून कोरोनावर प्रभावी अशा लसी तयार केल्या. पण कोरोनापासून बचाव करणाऱ्या याच लसींवर (CORONA VACCINE) अनेक शंका उपस्थित केल्या जात असल्याचं पाहायला मिळत आहे. लोकांचे प्राण वाचवण्यासाठी तयार करण्यात आलेली लस त्यांच्याच जीवावर उठली आहे का? असा प्रश्न अनेकजण विचारत आहेत.

सरकारनं लोकांचे जीव वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम सुरू केली आहे. देशातील लोकांना लसीचे 2 अब्जाहून अधिक डोस देण्यात आले. परंतु, गेल्या एक ते दीड वर्षांत देशात हृदयविकाराच्या झटक्यानं तरुणांचा मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. अशा परिस्थितीत यामागे ही लसच कारणीभूत आहे का? अशी चर्चा सुरू झाली आहे. मात्र, आता भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेनं (ICMR) यावर स्पष्टीकरण दिलं आहे. दरम्यान, ICMR नं नुकताच संशोधन केलं आहे. यामध्ये कोविड लस आणि आकस्मिक मृत्यू यांचा काही संबंध आहे का? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यात आलं आहे. भारतात कोविड-19 लसीमुळे तरुणांमध्ये अचानक मृत्यूचा धोका वाढलेला नाही, असं ICMR नं केलेल्या संशोधनातून समोर आलं आहे. तसेच, संशोधनाच्या निष्कर्षात म्हटलं आहे की, कोविड-19 पूर्वी हॉस्पिटलायझेशन, कुटुंबातील आकस्मिक मृत्यूची जुनी प्रकरणं आणि जीवनशैलीतील बदल यामुळे अचानक मृत्यूंची संख्या वाढली असून शकते. ICMR नं संशोधनात म्हटलं आहे की, लसी आणि आकस्मिक मृत्यू यांचा काहीही संबंध नाही. संशोधनातून समोर आलंय की, जर एखाद्यानं लसीचा किमान एक डोस घेतला असेल तर कोरोना व्हायरसमुळे मृत्यूचा धोका कमी होतो.

# 'कडक सिंह' चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर



आपल्या अभिनयाच्या जोरावर बॉलिवूडमध्ये विशेष स्थान निर्माण करणारे अभिनेते पंकज त्रिपाठी हे सध्या त्यांच्या 'कडक सिंह' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचं पोस्टर रिलीज करण्यात आलं. आता या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील पंकज त्रिपाठी यांच्या अभिनायनं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. 'कडक सिंह' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये पंकज त्रिपाठी हे एके श्रीवास्तव ही भूमिका साकारताना दिसत आहेत, एके श्रीवास्तवचा स्मृतिभ्रंश झाला आहे. त्यामुळे त्याला बऱ्याच गोष्टी आठवत नाहीयेत, असं ट्रेलरमध्ये दिसत आहे. 'कडक सिंह' या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर हा अंदाज लावला जाऊ शकतो की हा चित्रपट क्राईम थ्रिलर असणार आहे. 'कडक सिंह' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाल्यानंतर या ट्रेलरमधील पंकज त्रिपाठी यांच्या अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं आहे. 'कडक सिंह' हा चित्रपट 8 डिसेंबर 2023 रोजी रिलीज होणार आहे. हा चित्रपट झी-5 या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होत आहे. पंकज त्रिपाठी यांचे चाहते या चित्रपटाची उत्सुकतेने वाट बघत आहेत. या ट्रेलरला त्यांनी कॅप्शन दिलं, "एक अपघात, चार कथा,एक अस्पष्ट सत्य कडक सिंह सत्य शोधू शकतील का? ट्रेलर आऊट!" 'कडक सिंह' या चित्रपटामध्ये या चित्रपटामध्ये संजना संघीनं साक्षी श्रीवास्तव ही भूमिका साकारली आहे.

# 'बिग बॉस'च्या घरात राखीची एन्ट्री?

या छोट्या पडद्यावरील कार्यक्रमाची चाहत्यांमध्ये चांगलीच क्रेझ आहे. या कार्यक्रमातील स्पर्धकांची खेळी चाहत्यांच्या पसंतीस उतरली आहे. दिवसेंदिवस या कार्यक्रमात नव-नवे ट्विस्ट येत आहेत. आता या कार्यक्रमात बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' राखी सावंतची (RAKHI SAWANT) वाइल्ड कार्ड एन्ट्री होऊ शकते, असे म्हटले जात आहे. 'बिग बॉस 17' हा कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांनी पाहावा आणि कार्यक्रमाचा टीआरपी वाढावा यासाठी निर्माते वेगवेगळे प्रयत्न करत आहेत. पण स्पर्धकांची खेळी 'बिग बॉस' प्रेमींच्या पसंतीस उतरत असली तरी टीआरपीवर मात्र या कार्यक्रमाचा काहीही परिणाम झालेला दिसत नाही. त्यामुळे प्रेक्षकांचं मनोरंजन करण्याच्या हेतून या कार्यक्रमात आता वाइल्ड कार्ड स्पर्धकांची एन्ट्री होणार आहे. यात राखी सावंतच्या (RAKHI SAWANT) नावाचाही समावेश आहे. या पर्वाचा टीआरपी वाढावा यासाठी निर्माते राखीला या कार्यक्रमात सहभागी करुन घेत आहेत, असे म्हटले जात आहे. 'बिग बॉस 17' या वादग्रस्त कार्यक्रमात आता राखी सावंतची एन्ट्री होणार आहे. 'बिग बॉस 17' या कार्यक्रमातून 'बिग बॉस' आता पाच बोरिंग स्पर्धकांचा पत्ता कट करणार असल्याचं म्हटलं जात आहे. नाविद सोल या स्पर्धकापासून याची सुरुवात झाली आहे. नाविदचं मिड वीक एविक्शन झालं आहे. लवकरच आणखी स्पर्धकांचा पत्ता कट होणार असा दावा करण्यात आला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, नको असलेले स्पर्धक बाहेर पडल्यानंतर निर्माते सहा वाइल्ड कार्ड स्पर्धकांची 'बिग बॉस 17'च्या घरात एन्ट्री करतील. 'बिग बॉस 17'मध्ये राखी सावंची एन्ट्री होणार असल्याचं म्हटलं जात आहे. पण आदिल खान दुर्रानीसह (ADIL KHAN DURRANI) राखीची एन्ट्री होईल, असे म्हटले जात आहे. त्यामुळे 'बिग बॉस'च्या घरात चांगलाच धमाका होणार आहे. राखी सावंतची 'बिग बॉस'च्या घरात अनेक पर्वामध्ये एन्ट्री झाली आहे. 'बिग बॉस'च्या पहिल्या भागापासून राखी सावंत या कार्यक्रमाशी जोडली गेली आहे. त्यानंतर अनेक पर्वामध्ये राखीला कार्यक्रमाचा टीआरपी वाढावा यासाठी कार्यक्रमात विचारणा झाली आहे.'बिग बॉस 15' या कार्यक्रमात राखी तिचा त्यावेळीचा पती रितेशसोबत सहभागी झाली होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रितेशचा चेहरा राखीने पहिल्यांदा सर्वांसमोर आणला.



# अख्ख्या साऊथ इंडस्ट्रीचा त्रिशाला पाठिंबा

दक्षिण चित्रपटसृष्टीची प्रसिद्ध अभिनेत्री त्रिशा कृष्णनचा काही दिवसांपूर्वी लिओ (LEO) हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटात थलपथी विजयनं (VIJAY) देखील काम केलं आहे. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात मन्सूर अली खाननं या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारली आहे. सध्या मन्सूर अली खान (MANSOOR ALI KHAN) हा त्याच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आहे. त्याच्या या वक्तव्यावर दाक्षिणत्य चित्रपटसृष्टीतील कलाकारांनी संताप व्यक्त केला आहे. आता मन्सूर या वक्तव्यावर माफी मागण्यास देखील नकार दिला आहे. एका मुलाखतीमध्ये मन्सूर अली खान यानं लियो चित्रपटाबाबत आणि त्रिशाबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की मन्सूर म्हणतो की, "लिओ चित्रपटात माझा त्रिशासोबतचा बलात्काराचा कोणताही सीन नव्हता याबद्दल खेद वाटतो. मला वाटले होतं की, मी तिला बेडरूममध्ये घेऊन जाईन, जसे मी चित्रपटांमध्ये इतर अभिनेत्रींना घेऊन जातो. मी अनेक रेप सीन्स केले आहेत आणि माझ्यासाठी हे काही नवीन नाही. पण काश्मीर शेड्युलमुळे मला त्रिशाला पाहण्याची संधीही मिळाली नाही." मन्सूरनं त्रिशाबाबत केलेल्या या वक्तव्यावर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. अभिनेत्री त्रिशानं मन्सूर अली खानच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. तिनं ट्वीटच्या माध्यमातून तिची प्रतिक्रिया दिली आहे. या ट्वीटमध्ये तिनं लिहिलं, "अलीकडेच मी एक व्हिडीओ पाहिला आहे. ज्यामध्ये मन्सूर अली खान हे माझ्याबद्दल नीच आणि घृणास्पद रीतीने बोलले आहेत. मी याचा तीव्र निषेध करते.

# शिव-गौरीची जोडी पुन्हा एकत्र दिसणार

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिकांमध्ये 'काहे दिया परदेस' या मालिकेचा समावेश होतो. ही मालिका चांगलीच गाजली होती. कथानकासह या मालिकेतील पात्रांनाही प्रेक्षकांनी आपली पसंती दर्शवली. मालिकेतील गौरी आणि शिवची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या मालिकेनंतर त्यांना एकत्र पाहण्याची चाहत्यांना उत्सुकता आहे. . 'काहे दिया परदेस' या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांचं प्रेम मिळवलेली सायली संजीव, ऋषी सक्सेना ही जोडी पुन्हा एकदा एकत्र आली आहे. 'समसारा' (द वॉम्ब) या सिनेमात ही जोडी एकत्र आली असून, नुकताच या सिनेमाचा मुहूर्त संपन्न झाला. 'काहे दिया परदेस' या मालिकेत सायली आणि ऋषी यांच्यासह मोहन जोशी, शुभांगी गोखले हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत होते.



# शिवाली परब अन् निमिषच्या अफेअरच्या चर्चा

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम आहे. गेल्या काही दिवसांपासून हा कार्यक्रम प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. कार्यक्रमासह त्यातील विनोदवीरदेखील चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी हास्यजत्रेतील लवली अर्थात शिवाली परब (SHIVALI PARAB) आणि अभिनेता निमिष कुलकर्णीच्या (NIMISH KULKARNI) डेटिंगच्या चर्चा रंगल्या होत्या. आता अभिनेत्रीने या चर्चांवर मौन सोडलं आहे. शिवाली परबने काही दिवसांपूर्वी निमिष कुलकर्णीसोबतचा एक फोटो शेअर केला होता. त्यानंतर त्यांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं. या फोटोमध्ये शिवालीने निमिषचा फोटो शेअर करत कॅप्शन लिहिलं होतं की,"माझ्या निब्बाबरोबर डेटवर...क्यूट बेबी". निमिषसोबतच्या अफेअरच्या चर्चांबद्दल एबीपी माझाशी बोलताना शिवाली म्हणाली,"निमिषसोबतच्या अफेअरच्या बातम्यांमुळे लोकांना असं वाटतं की खरचं असं आहे. माझी आणि निमिष कुलकर्णीची बातमी खूप गाजली होती. आमच्यासह टीममधल्या निखिल बने आणि स्नेहल शिदम, प्रिया आणि ओंकार राऊत यांच्या रिलेशनच्याही चर्चा रंगल्या. पण असं काही नाही हे आमच्या घरीदेखील सर्वांना माहिती असतं. त्यामुळे घरच्यांकडून काही प्रोब्लेम होत नाही". शिवाली पुढे म्हणाली,"आम्ही कॉलेजमध्ये असल्यापासून गेल्या सात-आठ वर्षांपासून मित्र-मैत्रिणी आहोत. या बातम्यांमुळे कधीतरी काही समस्येचा सामना करावा लागू शकतो. रिलेशनच्या बातम्या खऱ्या आहेत असं लोकांना वाटतं. या बातम्यांमुळे जास्त जर्ज केलं जातं. पण एकंदरीत मला मजा येते. आमचं नातं मैत्रीचं आहे. त्यामुळे या रिलेशनच्या अफवा खरंतर आम्ही खूप एन्जॉय केल्या आहेत". 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिवाली परब आणि निमिष कुलकर्णी

# सूर्यादादा बाबरचा विक्रम मोडणार?

## टी-20 क्रिकेटमधील इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवकडे

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या T-20 आंतरराष्ट्रीय मालिकेसाठीचा टीम इंडियाचा नवा कर्णधार आणि आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेट रँकिंगमधील सध्याचा अव्वल फलंदाज सूर्यकुमार यादव याला आगामी मालिकेत नवा विक्रम रचण्याची संधी आहे. भारताचा धडाकेबाज फलंदाज विराट कोहली आणि पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमचा विक्रम मोडण्यापासून सूर्यकुमार काही पावले दूर आहे. सूर्यकुमार हा आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेट मध्ये सर्वात जलद 2000 हजार धावा करणारा फलंदाज बनू शकतो.**




मात्र, हा विक्रम मोडणे सूर्यासाठी इतके सोपे नसेल कारण या विक्रमावर आपले नाव कोरण्यासाठी त्याला पुढील डावात 159 धावांची गरज आहे. पुढच्या डावात त्याने 159 धावा केल्या तर तो बाबर आझमचा विक्रम मोडेल. सूर्याने पुढच्या दोन डावात 159 धावा केल्या तर तो बाबर आझम आणि पाकिस्तानचा यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान यांच्याशी बरोबरी करेल. बाबर आणि रिझवानने टी-20 च्या 52 डावांमध्ये 2000 धावांचा टप्पा गाठला होता.

सूर्याने पुढील पाच टी-20 आंतरराष्ट्रीय डावांत 159 धावा केल्या तर तो विराट कोहलीचा विक्रम मोडेल. कोहलीने आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमध्ये 2000 धावांचा टप्पा 56 डावात पार केला.

त्यामुळे आता आगामी मालिकेत सूर्यकुमार कोणत्या फलंदाजाचा विक्रम मोडतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आतापर्यंत, सूर्यकुमारने टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या 50 डावांमध्ये 46.02 च्या सरासरीने आणि 172.70 च्या स्ट्राइक रेटने 1841 धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 3 शतके आणि 15 अर्धशतके केली आहेत. सूर्यकुमार यादव पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघाची धुरा सांभाळणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेत सूर्यकुमार यादव टीम इंडियाचे नेतृत्व करणार आहे. हार्दिक पांड्याने 2023 मध्ये भारतीय टी-20 संघाचे नेतृत्व केले आहे. मात्र, 2023 च्या विश्वचषक स्पर्धेत त्याच्या दुखापतीमुळे कर्णधारपदाची जबाबदारी सूर्यकुमारवर सोपवण्यात आली आहे. या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांसाठी ऋतुराज गायकवाडला संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. श्रेयस अय्यर शेवटच्या दोन सामन्यात उपकर्णधार म्हणून संघात सहभागी होणार आहे.

### विक्रम मोडणे सोपं नाही!

» सूर्यासाठी इतके सोपे नसेल कारण या विक्रमावर आपले नाव कोरण्यासाठी त्याला पुढील डावात 159 धावांची गरज आहे. पुढच्या डावात त्याने 159 धावा केल्या तर तो बाबर आझमचा विक्रम मोडेल. सूर्याने पुढच्या दोन डावात 159 धावा केल्या तर तो बाबर आझम आणि पाकिस्तानचा यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान यांच्याशी बरोबरी करेल. बाबर आणि रिझवानने टी-20 च्या 52 डावांमध्ये 2000 धावांचा टप्पा गाठला होता. सूर्याने पुढील पाच टी-20 आंतरराष्ट्रीय डावांत 159 धावा केल्या तर तो विराट कोहलीचा विक्रम मोडेल. कोहलीने आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमध्ये 2000 धावांचा टप्पा 56 डावात पार केला. त्यामुळे आता आगामी मालिकेत सूर्यकुमार कोणत्या फलंदाजाचा विक्रम मोडतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आतापर्यंत, सूर्यकुमारने टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या 50 डावांमध्ये 46.02 च्या सरासरीने आणि 172.70 च्या स्ट्राइक रेटने 1841 धावा केल्या आहेत.

# बॉलरची दिरंगाई टीमला महागात पडणार!

## 5 धावांची पेनल्टी लागणार; काय आहे नवीन नियम?

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) नवीन नियम गोलंदाजांच्या विरोधात असल्याचा सूर उमटत असताना आता आयसीसीने आणखी एका नियमात बदल केला आहे. आगामी एकदिवसीय आणि टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यामध्ये गोलंदाजाने पुढील षटक टाकण्यासाठी 60 सेकंदांपेक्षा जास्त वेळ घेतल्यास, गोलंदाजी करणाऱ्या संघाला 5 धावांचा दंड ठोठावला जाईल. डावात तिसऱ्यांदा. हा नियम सुरुवातीला चाचणी म्हणून वापरला जाणार आहे. हा नियम पुरुषांच्या क्रिकेट सामन्यात लागू होणार असल्याचे मंगळवारी आयसीसीने सांगितले.**




आयसीसी बोर्डाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे की, 'मुख्य कार्यकारी समितीने मान्य केले की डिसेंबर 2023 ते एप्रिल 2024 या कालावधीत पुरुषांच्या वनडे आणि टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 'स्टॉप क्लॉक' चा वापर प्रायोगिक तत्वावर केला जाणार आहे. या स्टॉप क्लॉकचा वापर दोन षटकांमध्ये जाणाऱ्या वेळेवर लक्ष ठेवण्यासाठी केला जाणार आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, 'मागील षटक संपल्यानंतर 60 सेकंदांच्या आत गोलंदाजी सुरू करावी लागणार आहे. एकाच डाव्यात तिसऱ्यांदा हा प्रकार घडला तर पाच धावांचा दंड ठोठावला जाईल. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या यजमानपदांवर खेळपट्ट्यांवर बंदी घालण्याची पद्धतही आयसीसीने बदलली आहे. आयसीसीने सांगितले की, 'खेळपट्टी आणि आऊटफिल्ड मॉनिटरिंग नियमांमधील बदलांनाही मान्यता देण्यात आली आहे, ज्यात खेळपट्ट्यांचे मूल्यांकन कोणत्या निकषांवर केले जाणे सोपे होईल. एखाद्या मैदानाचा आंतरराष्ट्रीय दर्जा हटवण्यासाठी आता पाच वर्षात डिमेरिट अंकांची संख्या पाचवरून सहा करण्यात आली आहे.

### टाईम आऊटसारखा आहे नियम

» आयसीसी बोर्डाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे की, 'मुख्य कार्यकारी समितीने मान्य केले की डिसेंबर 2023 ते एप्रिल 2024 या कालावधीत पुरुषांच्या वनडे आणि टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 'स्टॉप क्लॉक' चा वापर प्रायोगिक तत्वावर केला जाणार आहे. या स्टॉप क्लॉकचा वापर दोन षटकांमध्ये जाणाऱ्या वेळेवर लक्ष ठेवण्यासाठी केला जाणार आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, 'मागील षटक संपल्यानंतर 60 सेकंदांच्या आत गोलंदाजी सुरू करावी लागणार आहे. एकाच डाव्यात तिसऱ्यांदा हा प्रकार घडला तर पाच धावांचा दंड ठोठावला जाईल. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या यजमानपदांवर खेळपट्ट्यांवर बंदी घालण्याची पद्धतही आयसीसीने बदलली आहे. आयसीसीने सांगितले की, 'खेळपट्टी आणि आऊटफिल्ड मॉनिटरिंग नियमांमधील बदलांनाही मान्यता देण्यात आली आहे, ज्यात खेळपट्ट्यांचे मूल्यांकन कोणत्या निकषांवर केले जाणे सोपे होईल. एखाद्या मैदानाचा आंतरराष्ट्रीय दर्जा हटवण्यासाठी आता पाच वर्षात डिमेरिट अंकांची संख्या पाचवरून सहा करण्यात आली आहे.